Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# मीना प्रभूंची प्रवासवर्णनं अल्प दरात उपलब्ध

18 Nov 2011, 1736 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

मटा ऑनलाइन वृत्त । मुंबई

जेष्ठ लेखिका मीना प्रभू यांची प्रवासवर्णनं आता सवलतीच्या दरात उपलब्ध होणार आहेत. पुरंदरे प्रकाशन आणि बुकगंगा डॉट कॉम यांनी पुढाकार घेऊन ही योजना राबवायचं ठरवलं आहे.

या योजनेमधे प्रभूंच्या चार पुस्तकांवर त्यांचीच इतर सात पुस्तकं मोफत मिळणार आहेत. त्याचबरोबर ५ हजार छायाचित्रांची एक डीव्हीडी सुद्धा मोफत मिळणार आहे. तब्बल ४००० रूपयांची पुस्तकं आता केवळ १४८० रुपयांमधे खरेदी करता येतील.

या योजने अंतर्गत ‘ माझं लंडन ’, ‘ दक्षिणरंग ’, ‘ चिनीमाती ’, ‘ मेक्सिकोपर्व ’, ‘ इजिप्तायन ’ आदि पुस्तकांचा समावेश आहे. अधिक माहीतीसाठी ८६००७५१११०/ ०२०-२४४७५३१० या क्रमांकावर संपर्क साधावा; ईमेल:- bookganga@myvishwa.com